सं.फौ.ख.क्र. ५११/२०२१
नितिन विरुध्द शामल
नि.क्र. ३३ खाली

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.**
**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए.एन.देवकर -**

माझी आरोपीशी ओळख व्यवसायातुन झाली होती, तसेच तो माझे मित्र महेश भंगाळे यांचा मित्र होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपीशी माझे व्यावसायीक संबंध होते. मी आरोपीस त्यास त्याच्या व्यवसायाकरीता पैशांची गरज भासल्यास मी त्यास आर्थीक मदत करीत असे. हे म्हणणे खरे नाही की पैसे देतेवेळी प्रत्येकवेळी मी आरोपीकडुन सुरक्षेपोटी धनादेश स्वीकारत असे. साक्षीदार पुन्हाहुन सांगतो की जास्त रक्कम दिल्यास मी सुरक्षेपोटी आरोपीकडुन धनादेश स्वीकारत असे. आरोपीने त्या रकमेची परतफेड केल्यानंतर मी ते धनादेश आरोपीसमक्षच फाडुन टाकीत असे. प्रस्तुत प्रकरणातील व्यवहाराच्या अगोदर आरोपीशी झालेल्या व्यवहाराच्यावेळी आरोपीने त्यास दिलेल्या किरकोळ स्वरुपाच्या रकमा मला रोख परत दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत प्रकरणातील पाच लाख रुपयांची रक्कम मला आरोपीने परत दिली होती आणि तशी नोटीस देखील त्याने मला पाठविली होती.

माझा अथर्व एंटरप्रायजेस या नावाने पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्तीच्या कामाचा तसेच घनकचरा नियोजनाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की तशा नावाचा परवाना मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. मी आयकर भरतो. हे म्हणणे खरे आहे की त्या बाबत कोणताही लेखी पुरावा मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. सन २०१९-२०२० या आर्थीक वर्षाच्या ताळेबंदात मी प्रस्तुत प्रकरणातील कथीत र.रु.५,००,०००/- ची नोंद केली होती किंवा कसे या बाबत मला आज रोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या बाबतचा लेखी पुरावा अभिलेखावर दाखल नाही. माझे सन २०१९-२०२० मध्ये वार्षीक व्यावसायीक उत्पन्न सुमारे एक कोटीच्या आसपास होते. त्या वर्षांत मी प्राप्तीकराचे रीटर्न भरले होते. तथापी त्या बाबतचा लेखी पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल नाही.

हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला र.रु.५,००,०००/- रोख स्वरुपात दिलेले होते. साक्षीदार स्वतहुन सांगतो की मी ती रक्कम आरोपीस दि.३१.०१.२०२० रोजी एनईएफटी पध्दतीने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की मी जानेवारी २०२० मधील उपरोक्त एनईएफटीचा व्यवहार नोंद असलेले बँक स्टेटमेंट प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्र.४० वरील धनादेश माझ्याकडे पुर्वीच होता. साक्षीदार सांगतो की तो धनादेश आरोपीने मला मी त्याच्या खात्यावर एनईएफटी ने रक्कम जमा केल्यानंतर दिला होता. हे म्हणणे खरे नाही की सदरील धनादेशावर माझे हस्ताक्षर आहे. मी सदरील धनादेश बँकेत सादर करण्यापुर्वी आरोपीस पुर्वकल्पना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीस तशी लेखी पुर्वकल्पना दिली नव्हती. मी महेश भंगाळे व विजय जाधव यांना साक्षीदार म्हणुन तपासणार आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्याकडे पुर्वीच असलेल्या सिक्युरीटी चेकचा मी गैरवापर केला आहे.

मी माझ्या व्यवसायाचे कर विवरणपत्र दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला फसविण्याकरीता प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे व खोटे साक्ष शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीने दिलेल्या कागदपत्रांचा गैरवापर कोल आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

***उलटतपास पुर्ण.***

***फेरतपास काहीही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.06.25 12:20:23 +0530

दि.२१.०६.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वाई.